शिक्षा अंतिम करणे बाबत (श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,
तत्कालिन विस्तार अधिकारी (पं) तथा कक्ष प्रमुख
(मग्रारोहयो) पं.स.पाथर्डी)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३३६/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ- १.या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२७८/२०२४ दिनांक ११/१०/२०२४. (सेवा निलंबन आदेश)
२. या कार्यालयाचे दोषारोप ज्ञापन साप्रवि-२/ग्रापं-३/२७९/२०२४,दिनांक ११/१०/२०२४.
३.विभागीय चौकशी अधिकारी यांचे नियुक्ती आदेश ग्रापं-३/ई ऑफीस क्र.१०९०९८६/ २०२५,दिनांक ०१/०४/२०२५.
४. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.४/खाचौ/ सी.आर.४१/२०२५, दिनांक- १२/०९/२०२५.
५.या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/२७८/२०२६/८११३००८, दि.०६/०७/२०२६.
६. गटविकास अधिकारी पंचायत समिती जामखेड यांचेकडील पत्र क्र.आस्था-१/६९४/२६ दि.१४/०७/२०२६ नुसार श्री मल्हारी पुंजाबा इसारवाडे,विस्तार अधिकारी (पं) यांचा खुलासा दि.१०.०७.२०२६
७. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ (१)

संदर्भ क्रमांक २ अन्वये, श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) तथा कक्ष प्रमुख (मग्रारोहयो) पं.स.पाथर्डी त्यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन व गैरव्यवहार केल्याने दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्रमांक ३ नुसार श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,विस्तार अधिकारी (पं) यांचे गैरतर्वनाविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक.४ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये पुढीलप्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत. श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,तत्कालीन विस्तार अधिकारी (पं) तथा कक्ष प्रमुख (मग्रारोहयो) पं.स.पाथर्डी यांचे वर चौकशी करण्यात आलेल्या ०४ दोषारोपांपैकी ०२ दोषारोप विभागीय चौकशी मध्ये आरोप सिध्द झाले नाही व ०२ आरोप अंशत: सिध्द झालेले आहेत.

विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविलेली असल्याने श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे,विस्तार अधिकारी (पं) तथा कक्ष प्रमुख (मग्रारोहयो) पं.स.पाथर्डी यांनी कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. त्यामुळे त्यांना संदर्भ क्र.५ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ (१) नुसार ५% टक्के रक्कम सेवानिवृत्ती वेतनातुन ०२ वर्ष कपात करणेची शिक्षा अंतिम का करण्यात येऊ नये? याबाबतची अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. खुलासा सादर न केल्यास अंतिम कारणे दाखवा नोटीस मध्ये नमुद केलेली शिक्षा तुम्हांस मान्य आहे, असे गृहीत

धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ६ अन्वये श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे, विस्तार अधिकारी (पं) त्यांनी याप्रकरणी खुलासा सादर केलेला आहे. श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे, विस्तार अधिकारी (पं) यांचे खुलाश्याचे अवलोकन करता प्राप्त खुलासाच्या अनुषंगाने श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे, विस्तार अधिकारी (पं) यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ (१) नुसार पुढील 05% रक्कम सेवानिवृत्ती वेतनामधून 02 वर्ष कपात करणे, शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२३०६०९२३ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 23-08-2026 15:59:37
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-

१. श्री.मल्हारी पुंजाबा इसारवाडे, विस्तार अधिकारी (पं) पंचायत समिती जामखेड

द्वारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड, जि.अहिल्यानगर.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जामखेड.

२/- सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी.